Maharashtra has been highly **spatially concentrated,** with a small number of urban districts accounting for a disproportionate share of state output. The slow pace of structural transformation, evident from the continued dominance of agriculture in employment and limited industrial job creation, has further constrained inclusive growth. In conclusion, while Maharashtra's economic performance at the macro level is strong, achieving **balanced, inclusive, and sustainable development** requires targeted regional investment, diversification of employment opportunities, enhancement of job quality, and focused policies addressing multidimensional deprivation. Addressing these interconnected challenges is essential for translating economic growth into broad-based socio-economic well-being.

## 11. References


1. ***NITI Aayog.*** *(2023). National Multidimensional Poverty Index: A Progress Review (2021–22). Government of India, New Delhi.*
2. ***Government of Maharashtra.*** *(2023). SDG India Index: Maharashtra State Progress Report. Planning Department, Government of Maharashtra.*
3. ***Ministry of Statistics and Programme Implementation (MoSPI).*** *(2018–2024). Periodic Labour Force Survey (PLFS) Reports. Government of India.*
4. ***Planning Commission of India.*** *(2014). Poverty Estimates for India: Tendulkar Methodology. Government of India, New Delhi.*
5. ***Times of India.*** *(2024). 27 districts in Maharashtra show per capita income below state average. The Times of India, Mumbai Edition.*
6. ***Times of India.*** *(2025). Maharashtra's unemployment rate remains above national average. The Times of India.*
7. ***Government of Maharashtra.*** *(2024). Economic Survey of Maharashtra 2023–24. Directorate of Economics and Statistics, Mumbai.*
8. ***NITI Aayog.*** *(2022). India's Workforce and Sectoral Employment Trends. Government of India.*
9. ***Vision IAS.*** *(2025). Regional Disparities in Economic Development in India. Vision IAS Current Affairs Material.*
10. ***Wikipedia.*** *(2025). Economy of Maharashtra; List of Indian States by Poverty Rate. Wikimedia Foundation.*

# छत्रपती शाहु महाराजांचे कृषी विषयक विचार

**प्रा.डॉ. तुकाराम दत्तात्रय गजर**
संशोधक मार्गदर्शक

**श्री. गणेश अर्जुन खळेकर**
संशोधक विद्यार्थी (भुगोल)

- **गोषवारा**

लोक कल्याणकारी राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांचे सर्व क्षेत्रातील काम हे अतिशय अलौकिक आहे. सामाजिक सुधारणे बरोबरच शाहु महाराजांनी सामाजिक विविध संस्था, साहित्य, कुस्ती, जलसिंचन प्रकल्प उभारणी, कला साहित्य, कृषी सुधारणा इ. उभारणी व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगीरी केलेली आहे. एक महान हेतुने प्रेरित झालेले राजे त्यांच्या राजर्षी पदाला पोहचले. छत्रपती शाहु महाराज हे केवळ छत्रपती राजा, छत्रपती समाजसुधारक नव्हते तर ते इतिहासात बदल घडवुन देणारे आणि नवीन इतिहास घडविणारे समाजसुधारक आहे असे म्हणणे योग्यच ठरेल. कृषी आणि शेतकरी यांचाही त्या काळी त्यांच्या उज्वल भविष्याचा विचार त्यांनी केंद्रस्थानी ठेवला होता. शेतकऱ्यांबद्दलची त्यांची तळमळ कमालीची मानावी लागेल. कृषी ही श्रमाची प्रतिष्ठाच आहे असे ते म्हणत, शेतीला पाण्याखाली आणण्यासाठी महाराजांनी आपल्या राज्यामध्ये विविध जलसिंचनाची कार्य केली. त्यामध्ये त्यांनी नविन विहीरी खोदणे, धरण बांधुन शेतीसाठी कालवे काढणे, लहान-मोठे तलाव तयार करणे, बंधारे तयार करणे तसेच त्याच काळी त्यांनी राधानगरी धरण हे सुध्दा त्या पैकीच एक मोठे धरण तयार केले आहे. कृषीसाठी त्यांनी विविध प्रयोग आणि संशोधन यांचाही मागावा घेतला. त्यांनी शेतकऱ्यांसाठी विविध तंत्रज्ञान, औजारे उपलब्ध करुन दिली होती. त्यांनी विविध तंज्ञाच्या मार्गदर्शनाखाली कृषीसाठी विविध प्रयोग सुध्दा राबविले होते. जनावरांची प्रदर्षनी घडवुन आणली व नविन पिके घेण्यास शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले व कृषीमध्ये विविध बदल घडवुन आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला. या प्रमाणे शाहु महाराजांनी कृषीसाठी अमुलाग्र बदल घडविण्याचा प्रयत्न केला होता.

- **प्रस्तावना**

महाराष्ट्राच्या जडघडणीमध्ये मोलाचे कार्य करणाऱ्या अनेक समाजसुधारकापैकी तसेच थोर समाज सुधारकापैकी महाराष्ट्रामध्ये छत्रपती शाहु महाराजांचे स्थान एक आगळे वेगळे, उच्च दर्जाचे होते. सामान्य माणुस केंद्र बिंदु माणुन त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी आपल्या तळमळतेने त्यांनी आपले आयुष्य त्यांच्यासाठी वाहुन दिले. महाराष्ट्रातील समाज सुधारकांपैकी एक प्रामाणिकपणे काम करणारा

क्रांतीकारक नेता म्हणुन त्यांचे योगदान मोठे आहे. त्यांनी आपल्या राज्यामध्ये कृषीला जास्तीत-जास्त प्राधान्य दिले व त्या कृषी व्यवस्थेमध्ये अमुलाग्र बदल घडवुन आणला. कृषी मधील शेतकऱ्यांचा उत्पन्नात कशा प्रकारे जास्तीत-जास्त वाढ घडुन येईल यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले. शाहु महाराजांच्या प्रभावामुळे खऱ्या अर्थाने कल्याणकारी राज्याची भुमिका प्रथमच आमलात आली. छत्रपती शाहु महाराज यांच्या अठावीस वर्षाच्या कार्यकाळात कृषी व्यवस्थेसाठी जेवढे प्रयत्न करता येईल, तेवढे प्रयत्न त्यांनी केले त्यामुळेच आज महाराष्ट्रात दरडोई उत्पन्न असणाऱ्या जिल्ह्यामध्ये कोल्हापुर जिल्ह्याचा क्रमांक आग्र स्थानी आहे. याचे संपुर्ण श्रेय छत्रपती शाहु महाराज यांना देण्यात येते. शाहु महाराजांनी कृषीमध्ये अमुलाग्र बदल घडवुन त्याकाळी आणला आहे. छत्रपती शाहु महाराजांनी कुठलेही जातभेद न करता हिंदू मुस्लीम एकोपा आपल्या राज्यात निर्माण केला होता. त्याच वेळी त्यांनी काही मुस्लिम विवाह सुध्दा लावली होती. रायबाग येथे खास विणकरांची संस्था होती त्यामध्ये चाळीस पैकी वीस मुस्लिम कुटुंबिय होती. शाहु महाराजांनी बहुजन समाजातील वकीलांना ज्या वकिलांच्या सनद्या दिल्या त्यात अनेक मुस्लिमांचा सामावेश होता. अशा प्रकारे शाहु महाराजांनी आपल्या राज्यात धर्मनिरपेक्षता टिकुन ठेवली त्याकाळी दुष्काळ पडल्यामुळे सर्व जाती धर्माच्या मुलांसाठी वस्तीगृह काढली. त्यामध्ये सर्व जाती धर्माचे मुले होते विशेषतः करुन ब्राह्मनापासुन ते शुद्रांपर्यंत सर्वांचे मुले या वस्तीगृहामध्ये रहायचे. त्या काळी महाराज शिक्षणावर वार्षिक एक लाख रुपये खर्च करीत असत. शाहु महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुखनायक व अगरकरांच्या सुधारक वृत्तपत्रांना राज्यांनी आर्थिक सहाय्य केले. कोल्हापुरात आर्य समाजाची शाखा ही त्यांनी स्थापन केली. याप्रमाणे कृषी बरोबर शाहु महाराजांची अतिशय मोलाची सामाजिक कार्य आहेत.

- **उद्दिष्टे**

➢ महाराजांचे कृषी विषयक त्या काळचे आधुनिक करण्यामागचे धोरण अभ्यासने.

➢ शाहु महाराजांचे कृषी पुरक व्यवसायांचा आढावा घेणे.

➢ शाहु महाराजांचे जलसिंचन व जल व्यवस्थापन कार्य अभ्यासने.

- **गृहितके**

➢ शाहु महाराजांचा कृषी विषयक विचार आदर्श होता.

➢ महाराजांच्या कारकिर्दीत शेती हा प्रधान व्यवसाय होता.

➢ शाहू महाराज अप्टावधानी राजे होते.

➢ शाहू महाराजांचे कार्य अतिशय नियोजनबध्द व अविधांत असे होते.

- **संशोधन पध्दती**

कोणत्याही प्रकारचे संशोधन करत असतांना तथ्य संकलनाची आवश्यकता असते. प्रस्तुत शोध पेपर मध्ये स्त्रोतांचा माध्यमातून तथ्य संकलित केले आहे. विविध संदर्भग्रंथ, प्रकाशित-अप्रकाशित वर्तमानपत्रे, इंटरनेट, व्हिडीओ, युट्युब तसेच लिखित स्वरुपातील लेख व इतर माहितीचा आधार घेण्यात आला आहे.

- **विशेष विवेचन**

आपण आपल्या देशाचा विचार करता भारत देशात जवळपास लोकांचा व्यवसाय शेती हा आहे तसेच शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे, तेव्हा शेतीचा उध्दार म्हणजे शेतकऱ्यांचा उध्दार, पर्यायाने सर्वांचा उध्दार हे सुत्र ध्यानात घेऊन राजर्षी शाहू छत्रपतींनी आपल्या संस्थानात शेतीसाठी मूलभुत सुधारणा केली. कृषीचा जोड म्हणुन नवनवीन उद्योगधंदे सुरु केले आणि या उद्योगधंद्यांना या तिन्ही क्षेत्रात आघाडीवर आहे. कोल्हापुरच्या प्रगतीचा पाया शंभर वर्षापुर्वी शाहु महाराजांनी घातला, लोकराजा, रयतेचा राजा, सर्वांगपुर्ण राष्ट्र पुरुष असा गौरव वि. रा. शिंदे यांनी केला अशी त्यांची ओळख आहे. शाहु महाराजांचे शेती, शेतकरी यांच्या बद्दलचे धोरण कसे होते, याचा शोध घेण्याचा हा प्रयत्न होता. छत्रपती शाहू महाराजांची पारंपारिक शेतीला फाटा दिला. शाहू महाराज यांच्या कार्याचे द्रष्टे पण त्यांच्या प्रत्येक पावलांमध्ये दिसुन येते. कोणतेही काम करतांना त्यांनी कायम पुढील शेकडो वर्षांचा विचार केला. शेतीकडे ही त्यांनी कधीच पारंपारीक दृष्टीने पाहिले नाही. माझा शेतकरी शहाणा झाला पाहिजे, असा त्यांचा अट्टाहास होता. म्हणुनच त्यावेळी त्यांनी नवनवीन पिकांच्या लागवडीचे प्रयोग केले. व शेतीला आधुनिक करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये त्यांनी स्वतः जातीने लक्ष घातले. त्यामध्ये त्यांनी रेशीम, वेलदोडे, कोकोआ, इंडियन रबर, अंबाडी, लाख, शिंगाडे, कंबोडियन कापूस अशा अनेक पिकांची लागवड व प्रक्रिया करण्याचे प्रयोग केले आपल्या संस्थानात कॉफी व चहाची लागवड केली. आपल्या संस्थानात पोलादी नांगर देणारा राजा म्हणून देखील ते ओळखले जाऊ लागले. त्यावेळी इंग्रजांनी हिंदुस्तानातील तोफा वितळून त्याचा उपयोग शस्त्रास्त्रे तयार करण्यासाठी करुन घेतला. शाहू महाराजांनी आपल्या राज्यातील तोफा इंग्रजांनी नेऊ नयेत म्हणुन त्या तोफा शेतकऱ्यांसाठी पोलादी नांगरी तयार करण्यासाठी किर्लोस्कर कंपनीला दिल्या.

शेतकरी वर्गास आधुनिक शेतीची गोडी लागावी म्हणुन अंबाबाईचा रथोत्सव, जोतिबा यावा अशा ठिकाणी व गावोगावी जेव्हा जत्रा-यात्रा असतात. तेव्हा तिथे त्यांनी शेतकी प्रदर्शने भरविली, अशा

प्रदर्शनातुन शेतीची आधुनिक साधने, उत्कृष्ट उत्पादनाच्या धान्याचे नमुने, माहितीपत्रके आदींची मांडणी केलेली असे.

शाहू महाराजांची शेती आणि शेतकरी यांच्या बदलची आस्था कमालीची संवेदनशील होती. आपला सारा देश कृषी प्रधान, महाराजांची राज्य ही शेतीप्रधान आहे, पण शेतकरी मात्र न अडकलेल्या अवस्थेत जगतो आहे हे एक सत्य होते. कोल्हापुर संस्थानाची त्या वेळची लोकसंख्या आठ ते नऊ लाखाच्या दरम्यान होती, आजही कितीतरी अधिक आहे. या भुमीचा मुख्य व्यवसाय शेतीच होता, पण शेतीचे लहान लहान तुकड्यात विभाजन झाले होते. वाटणी व्यवहाराने अशा लहान तुकड्याची निर्मिती झाली होती. ती बदलावी आणि त्याचे रुपांतर मोठ्या शेतीमध्ये व्हावे, हा त्यांचा विचार होता म्हणजे शेती किफायतशीर होईल आणि शेतकऱ्यांची प्रगती होईल असे त्यांचे स्पष्ट मत होते. यासाठी त्यांनी 1913 ला अविभाज्य इनामाचा कायदा केला. त्यांनी सर्वांसाठी एक महत्वाचा संदेशही दिला ते म्हणत, कृषी कर्मापासुन दुहेरी उन्नती होते. स्वतःला सुख तर होतेच, शिवाय दुसरे मनुष्य जाती नाही सुख मिळते. पुढे ते म्हणतात, हे असे शेती कर्म करणारा माणुस, समाज खुल्या अर्थाने दिला आहे. अंध माणसाला जगविने, त्याचे पालन पोषण करने, त्याला बलवानही करते आणि इतरांनाही जगवा असे संदेश देते. धर्माची प्रतिष्ठा जगात मोठी फारच मोठी आहे, शेती ही धर्माची प्रष्ठिान आहे असे ते नेहमी म्हणत भारतातील शेतकऱ्यांला शेती करता येत नाही असे नाही. परंतु त्याला परंपरागत पध्दतीने शेती करणे भाग पडले असे ते म्हणत. त्यांनी शेतकऱ्यांच्या काम करण्याच्या मात्र चार प्रकारचे अडथळे शाहु महाराज सांगतात. त्यात 1) शेतकऱ्यांचे अज्ञान, 2) भांडवलाची कमतरता, 3) शेतीचा लहान आकार, 4) शेतमाल विकण्या बाबत संघटनेचा अभाव यामुळे शेतकरी वर्गाची प्रगती होत नाही, असे त्यांचे मत होते.

- **कोल्हापूर संस्थानाची पाहणी**

छत्रपती शाहू महाराजांनी संस्थांना कारभार हाती घेतल्यानंतर, त्यांनी कृषी विकासाच्या दृष्टीने पाहणी करुन त्यांनी शेत जमिनीच्या शेतकऱ्यापासुन ते शेतजमिनीच्या मजुरापर्यंत नैसर्गिक स्थिती पाणीपुरवठ्याशी कमतरता, शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती, शेतकऱ्यांचा अशिक्षितपणा, भांडवलाचा अभाव, शेतीमाल विक्री करण्याबाबत इत्यादी बाबींची माहिती करुन घेतली व त्या दृष्टीने शेती विकासाचे प्रयत्न

पिके यामध्ये सुधारणा घडवण्याच्या दृष्टीने, शेतीविषयक ज्ञान, शेतीचे आधुनिक तंत्र समजण्यासाठी शेती विस्तार करण्याचे गरजेचे होते.

- **कृषी शाळा व शेतकऱ्यांसाठी प्रात्यक्षिके**

शाहू महाराजांनी शेती पिके, अवजारे यामध्ये आधुनिक आणण्याचे दृष्टीने संदर्भत काम हाती घेतले. यात कृषी विस्तारावर जास्तीत जास्त भर देण्याचे ठरवुन प्रयत्न केले. सुधारित बि-बियाणे व सुधारित शेती अवजारे वाटप करुन नवीन पिके, फळपिके यांचे प्रात्यक्षिके दाखविले. याशिवाय नवीन नवीन योजना ही बियाणांची माहिती देण्यासाठी शेतकी शाळा सुरु केल्या. अशी वेगवेगळी शेतीविषयक कामे करुन घेण्यात त्यांनी शेती विस्तार कार्यास चालना दिली.

- **कृषी विषयक शैक्षणिक सुविधा**

शेतकऱ्यांचे अज्ञान दुर करण्यासाठी त्यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हायला हवा. शेतीला चालणार नाही, तर शेती विषयक शिक्षण दिले पाहिजे, हे ओळखुन त्यांनी शेतकऱ्यांचा प्रशिक्षित करुन काम करण्यासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले, याशिवाय खेडेगावातच शाळेतच त्यांनी शेतीविषयक माहिती दिले, शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणासोबतच शेतकी शिक्षण त्यांनी उपलब्ध करुन दिले. शेतीत आधारित काम व्हायचे झालयास शेतकऱ्यांना शेतीचे शिक्षण मिळावे, ह्या दृष्टिकोनातुन महाराजांनी 1896 पासुन राजाराम विद्यालयात शेतीचा अभ्यासक्रम सुरु केला. 1912-13 मध्ये कोल्हापुरात किंग एग्रीकल्चर इन्स्टिट्युट नावानी संस्था स्थापन केली, तेथे पीक प्रात्यक्षिके करुन शेतकऱ्यांना शिक्षण दिले. उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती संस्थांनामार्फत सुरु केल्या. शेती शिक्षणाची व्याप्ती वाढविण्यासाठी स्वतंत्र शेती शाखेची कोर्सची स्थापना केली, या सोबतच जंगलशास्त्र याबरोबरच जोडधंदे म्हणुन मधू मक्षिका पालन, सुतकताई, गालिचे बियाणे असे शिक्षण ही दिले.

- **शेती व प्रात्यक्षिके**

शेतकऱ्यांना शेतीमध्ये झालेल्या सुधारणांची प्रत्यक्ष माहिती व्हावी, या उद्देशाने नोव्हेंबर 1909 मध्ये जैन बंधुचे कोल्हापुर येथे एक शेती विषयक प्रदर्शन भरवले होते. त्यामध्ये शेती अवजारे, स्थानिक कामगारांनी आपल्या शेतमालावरच्या कपडाचे नमुने, शिवणकाम, विणकाम, भरतकाम इ. प्रदर्शनात ठेवण्यात आले होते. तसेच या संदर्भात जनावरांचे वेगवेगळ्या जाती, शेतीविषयक पिक नमुने, औद्योगिक मध्ये मुळ युनिट, सुतकाम, व बी-बियाणामध्ये सुधारित जाती, खते तयार करण्याच्या वेगवेगळ्या पध्दती यावर भर देण्यात आला ह्या प्रकारे शाहु महाराजांची आपल्या संस्थानात शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी, त्यांच्या उत्पत्तीसाठी शेतकऱ्यांना प्रकल्प देऊन त्यांच्यासाठी नवनवीन उपक्रम राबवित असत, मग

त्यामध्ये शेतीसंबंधी प्रदर्शने, नवनवीन अवजारे, बि-बियाणे, यांची प्रात्यक्षिके सादर केली जात असे, अनेक शेती विषयक विषयाला धरुन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

- **कृषी क्षेत्रात नवनवीन लागवडीचे प्रयोग**

शाहू महाराजांनी त्यांच्या संस्थानात शेतीमध्ये नवनवीन लागवडीचे प्रयोग केले. यात कोरफड लागवड, केळी लागवड, चहा, कॉफी, रबर, ताग अशा नवनवीन पिकांचे प्रयोग त्यांनी शेतात सुरु केले. कॉफी व चहाच्या लागवडीकडे ही महाराजांनी जातीने लक्ष दिले होते. कॉफी बरोबर चहाची लागवडी सुरुवातीला पन्हाळ्यात केली. ती लागवड यशस्वी झाल्यानंतर पुढे चहाची लागवड भुंदरगड पेट्यातील शेलाप येथे केली होती. याशिवाय रेशीम शेतीच्या लागवडीचा प्रयोग केला, शाहु महाराजांनी आपल्या संस्थानात इंडियन चहा, वेलदोडे, कोको, व इतर प्रकारचे अंबाडी, ताग, रबर, बटाटे, शिंगाडे, शिरोळ, बेळगावी व लाख पेटामध्ये कवीडियन कापुस इ. प्रयोग केले. शिवाय फळबागा ही वाढवल्या या बागामध्ये आंबा, जांभुळ, फणस, हिरडा, ताग, काजु, मोह इ. झाडांची लागवड केली. त्याचप्रमाणे औषधी वनस्पतीची ही लागवड केली.

- **कृषीविषयक जोड व्यवसाय व सहकारी पतसंस्थाचा कर्ज पुरवठा**

शेती सोबतच शेतीच्या जोड व्यवसायांकडे महाराजांनी लक्ष दिले. कृषी सोबत पशुपालन व रक्षण तसेच मधुमक्षिका पालन इ. जोड व्यवसायाला त्यांनी प्राधान्य दिले. आपल्या भागा दुधा तुपाची समृध्दी झाली पाहिजे असे त्यांचे मत होते. शेतीच्या विकासासाठी व आधुनिकीकरणासाठी शेतकऱ्यांना भांडवल पुरवठा होणे गरजेचे असते. मात्र शाहु महाराजांपुर्वी त्यांच्या राज्यात सावकार लोक शेतकऱ्यांचे पिळवणुक व आर्थिक शोषण करत असते. या संकटातुन शेतकऱ्यांची मुक्तता करण्यासाठी आपल्या संस्थानात सहकारी पतपेढ्या शाहु महाराजांनी स्थापन केल्या. 1913 मध्ये पहिली अर्बन को-ऑप ही संस्था स्थापन केली. त्यानंतर बलभीम सहकारी, शाहु को-ऑप अशा संस्था निर्माण करुन शेतकऱ्यांना सावकारांच्या त्रासातुन मुक्त केले. या संस्थेद्वारे शेतकऱ्यांना कमी व्याजदराने कर्जपुरवठा व्हावा. शेतकरी, कारागीर, उद्योग यांना भांडवल उपलब्ध व्हावे, कामगार मुक्त व्हावे, शेती व शेतपुरक उद्योगाची वाढ व्हावी अशी तळमळ शाहु महाराजांची होती. उद्योग निर्माण यामध्ये ते अग्रेसर ठरले. कोल्हापुरची शाहु मिल हे त्याचे उत्तम उदाहरण. येथे पहिल्यांदा सुत आणि नंतर कापड निर्मिती सुरु झाली आणि नंतर जिनिंग फॅक्टरी सुरु झाल्या. याप्रमाणे सहकार चळवळीमध्ये कोल्हापुर जिल्हा आज पण महाराष्ट्रात व देशात अग्रस्थानी आहे.

- **कृषीमाल प्रक्रिया उद्योग व बाजारपेठा**

शेतीमालाला योग्य भाव मिळावा यासाठी त्यांनी प्राधान्य दिले. त्यासाठी शाहू महाराजांनी शेती प्रक्रिया उद्योग सुरु करण्याची गरज लक्षात घेऊन असे प्रक्रिया उद्योग करण्यासाठी त्यांनी भांडवल देण्याची व्यवस्था केली. त्यासाठी 12 तेलगिरण्या त्यांनी संस्थानात सुरु केल्या. 1905-1906 मध्ये शाहु मिल ही कापसावर प्रक्रिया करणारी कापड गिरणी सुरु केली. तसेच अनेक पिकाणी कापुस जिनिंग व प्रेसिंग अशा गिरण्या चालु केल्या. या कापसाच्या प्रक्रिया उद्योगासाठी त्यांनी निरनिरळ्या सवलती, मदती त्यासाठी लागणारी जमीन भांडवल पुरविले. यामुळेच भविष्यातही कारखानदारी मोठ्या प्रमाणात वाढण्यास मदत झाली.

शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळावा म्हणून त्यांनी शेती जवळुन बाजारपेठा सुरु केल्या. यापुर्वी 1895 मध्ये पहिली बाजारपेठा स्थापन केली. तेथे कापुस, सुत, तेल बिया, गुळ, विक्रीची व्यवस्था गड हिंग्लज येथे बाजारपेठ सुरु केली. तंबाखू साठी व इतरमाल विक्रीसाठी जयसिंगपुर बाजारपेठ सुरु केली.

- **सेंद्रिय रासायनिक खते व शेतीसाठी सुधारित तंत्र व अवजारे**

उत्पन्न वाढविण्यासाठी नवनवीन सेंद्रिय व रासायनिक खतांची निर्मिती करुन ही खत स्वस्त दरात शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिली. तसेच या खतांचा तुटवडा निर्माण होणार नाही. याची काळजी देखील घेतली. त्याचा परिणाम म्हणजे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली. तसेच त्यांनी शेतीसाठी आधुनिक व योग्य प्रमाणात अवजारे करुन देण्यावर भर दिला, त्यानुसार इलेक्ट्रॉनिक्स नोटर्स वगैरे बाबत प्रात्यक्षिके व प्रदर्शने भरवली, लोखंडी नांगर, लोखंडी नांगरे, लोखंडी नीट साखळ्यासाठी आधुनिक तंत्राचा वापर, आधुनिक यंत्रसामुग्रती, ऑईल इंजिनवर चालणारे पंपिंग गेटुन, ऑईल इंजिन पंपिंग सेट, ट्रॅक्टर्स, बेलगाड्या, ऊसपॉवर क्रशन, लोखंडी बैल, इ. अशा प्रकारे कोल्हापुर संस्थानांमध्ये शेती सुधारित अवजारे उपलब्ध होती.

- **जलसिंचन सुविधा**

कोल्हापूर संस्थानामध्ये पुष्कळ पाऊस पाणी साठविण्याची नैसर्गिक उनुकुलता असुन ही पाणी साठवुन ठेवण्याची काहीही काम शाहु महाराजांपुर्वीच्या काळात झाली नव्हती. शाहू महाराजांनी सन 1896 पासुन पाणीपुरवठा विभागाकडे लक्ष दिले. शेतकऱ्यांना विहिरी बांधण्यासाठी सवलतीच्या दरात कर्ज पुरवठा केला. त्यामुळे उसासारखी बारमाही पिके घेतली जाऊ लागली. बागायती शेतीचे प्रमाण वाढु लागले. याशिवाय महाराजांनी विहिरी, बंधारे, तळी, कालवे, धरण बांधण्यात प्रोत्साहन व सहाय्य केले.

इच्छुकांना प्रोत्साहन व मदत देऊन उद्योग व्यापाराला चालना व गती देण्याचे फार मोठे कार्य महाराजांनी केले.

सध्या कोल्हापुर जिल्हा म्हटल, की समृध्दीची शिखरे समोर येतात या जिल्ह्यात शेतीची मोठी सुधारणा झाली आहे. याचे खरे क्षेय जाते ते राजर्षी शाहु महाराजांना, त्यांनी उभारलेल्या राधानगरी धरण यामुळे जिल्ह्यातील शिवारे हिरवाईने फुलली आहेत. या धरणाला शंभराहुन अधिक वर्ष झालेली आहे. राजर्षी शाहु महाराजांची ही दुरदृष्टी आज ही पथदर्शी ठरत आहे.

दुष्काळ निवारण्याचा खरा मार्ग शेतीला पाणी पुरवठा वाढविणे हाच होय, असा विचार शाहु महाराज यांचा होता. यासाठी नद्या, विहिरी, धरण आणि तलाव व सर्व घटकांचा अवलंब शेती व पिण्याच्या पाण्यासाठी संस्थानात होत होता. 1915-1916 वर्षाच्या अहवालातुन असे दिसते की कोल्हापुर संस्थानात संस्थामधुन 39783 विहिरीतुन 39845 आणि तलावातुन 232 एकर असा एकूण 7986 एकर क्षेत्रावरील शेतीला पाणीपुरवठा होत होता. तळी, विहिरी, बंधारे, तलाव, धरण बांधण्यात शाहु महाराज यांनी प्रोत्साहन दिले व सहाय्य केले याचे उदाहरण म्हणजे राधानगरी धरण हे दुरदृष्टीचे प्रतिकच आहे.

शाहू महाराजांनी केवळ भुजलातुन पाणी न घेता नद्यामधील पाण्याचा प्रभावी वापर करुन नवीन संकल्पना मांडली. नद्यांचे पाणी अडवुन ते पाणी शेतीतील पिकांसाठी उपयोगात आणावे यासाठी सर्वेक्षण केले. जलसाक्षरता व जलसंधा रण क्षेत्रात आज ही मार्गदर्शक ठरावे, असे मौलिक कार्य राजर्षी शाहु महाराज यांनी केले. असे एक ना अनेक प्रयोग व धोरण या राजाधिराज यांनी राबवले, त्यामुळे शाहु महाराजांने कार्य अतिशय नियोजनबध्द व अविश्रांत असे होते. हा अष्टावधानी राजा त्या काळचे लेणेच ठरला. कृषी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे, तेव्हा शेतीचा उध्दार म्हणजे शेतकऱ्यांचा उध्दार, पर्यायाने सर्वाचा उध्दार हे सुत्र ध्यानात घेऊन राजर्षी शाहु छत्रपतींनी आपल्या संस्थानात शेतीसाठी मुलभुत सुधारणा करुन त्यांना कोल्हापुरच्या समृध्दीचे जनक म्हणतात.

- शेती बरोबरच शाहु महाराजांनी नवनवीन उद्योगधंदे सुरु केले, त्यामुळे हा जिल्हा आज ही शेती, सहकार व उद्योगधंदे या तिन्ही क्षेत्रात आघाडीवर आहे. कोल्हापुरच्या या प्रगतीचा पाया शंभर वर्षांपुर्वी शाहु महाराजांनी घातला.
- शाहु महाराजांनी शेतीसाठी पाणी मिळावे म्हणुन सार्वजनिक पाटबंधारे धोरण जाहीर करुन त्यात वहिरी, तलाव, बंधारे यांच्या योजना तातडीने अंमलात आणल्या त्यामुळे नगदी पिकांचे व बागायती शेतीचे प्रमाण वाढुन त्यामध्ये ऊसचे क्षेत्र व शेतकऱ्यांच्या उत्पन्ना वाढ झाली.
- शेतकी शिक्षणासाठी त्यांनी बिनव्याजी कर्ज दिले व शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

- शेतकी प्रदर्शन व प्रात्यक्षिके भरवून शेतकऱ्यांचा विकास कशा पध्दतीने साधता येईल व जीवनमान उंचावण्याचा पुरेपुर प्रयत्न केला.
- शेतीमध्ये नवनवीन प्रयोग त्यांनी राबविले. त्यात लाख, शिंगाडे, कंबोडियन कापूस, रेशीम, वेलदोडे, इंडियन रबर, ताग, अंबाड, बटाटे, कोकोआ असे अनेक पिकाची लागवड केली. तसेच चहा, कॉफी इ. ची नगदी पिके त्यांनी आपल्या संस्थानात घेतली.
- शाहु महाराजांमुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारणी, नगदी पिकांमध्ये वाढ झाली व त्यामध्ये प्रामुख्याने ऊसाचे, तेल पिके घेण्यात भर घतला. गुऱ्हाळ, तेलगिरण्यात वाढ झाली.
- कोल्हापुरी गुळ प्रसिध्द झाला. शेतमालावर अनेक उद्योगधंदे व कारखाने स्थापन करण्यात आली. ऊस पिक क्षेत्रात वाढ झाली. चहा, कॉफी या नगदी पिकांचे उत्पादन वाढले.
- बाजारपेठेचे प्रमाण वाढले, शेतकरी शेतीबरोबरच जोडव्यवसाय करु लागले. मधुमक्षिकापालन उद्योग त्यांनी सुरु केला व तो पुढे चालुच आहे. अशा प्रकारे राजर्षी शाहु महाराजांनी आपल्या रयतेच्या उन्नतीसाठी सहकारी, सामाजिक, कृषी उद्योग आदी क्षेत्रात भरीव कार्य केले.
- जलसिंचन वाढल्यामुळे त्याठिकाणी जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न मिटला व दुग्धव्यवसाय वाढीस लागला व शेती ला जोड व्यवसाय म्हणुन मदत झाली.

**संदर्भ**

1. महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास डॉ किशोरकुमार गव्हाणे, डॉ. सुखदेव शिंदे : एज्युकेशनल पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्युटर्स, आवृत्ती 2014.
2. महाराष्ट्रातील समाजसुधारक विचारधारा व कार्य, डॉ. एस. एस. पाठक, कैलास पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती जुलै 2014.
3. राजर्षी शाहु गौरव ग्रंथ संपादन डॉ. जयभिमराव पवार, प्रकाशन महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी
4. लोकमत : जून 26, 2020: विश्वास पाटील
5. राजर्षी शाहु महाराज : डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर, संस्कृती प्रकाशन
6. Mulnivasinayak.com-published on: 26 June 2022
7. महाराष्ट्राचा इतिहास एकनाथ रामचंद्र पाटील, 24 वी आवृत्ती, 2018.